*Review Of Research*
Vol. 2, Issue. 12, Sept. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

**ORIGINAL ARTICLE**

# *''लोकशाही प्रक्रिया व पंचायतराज : नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा चिकित्सक अभ्यास' 2000–2010''*

*गड्डमवाड संजय विश्वनाथ*

एम. ए., एम. फिल (राज्यशास्त्र) हु. बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर जि. हिंगोली

***सारांश :***

पंचायती आपणांस नवीन नाहीत. भारतात प्राचीन काळातील गावाचा कारभार गावातील ग्रामस्थ एकत्र येऊन चालवित असत. गावातील गरजेची कामे ग्रामस्थ स्वतः करीत असत. प्राचीन काळात गावातील सफाई, आरोग्य, व्यापार, उद्योग, व्यवसाय, यात्रा, बाजार अशा अनेक गोश्टींची व्यवस्था 'ग्रामसभा' करीत असे. ग्रामसभा कायदे–कानूनही करीत असे. तसेच कौटुंबिक, सामाजिक अडचणींचे निरसन ही करत असे. ''पाचामुखी परमेश्वर'' ही म्हण आपणा सर्वांना माहित आहेच. यावरुन आपल्या देशात सत्तेचे विकेंद्रीकरण व पंचायतराज पद्धती प्राचीन काळापासून अस्तित्वात होती, असे दिसून येते.

## *प्रस्तावना :*

### *महाराष्ट्रातील पंचायतराज पध्द्ती :*

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपला देश प्रजासत्ताक राज्य म्हणून अस्तित्वात आला. आपल्या राज्य घटनेने 'लोककल्याणकारी राज्याचे तत्व' स्विकारले आहे. लोकशाही राज व्यवस्थेमध्ये लोकांच्या मताला अधिक महत्त्व असल्यामुळे, अधिकाधिक सत्ता जिल्हा, तालुका आणि गाव पातळीपर्यंत पोहचविणे अभिप्रेत आहे. केंद्र शासनाने बलवंतराय मेहता समितीच्या अहवालाच्या आधारे देशामध्ये त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी पावले टाकली. महाराष्ट्राने मेहता समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी वसंतराव नाईक समितीची नियुक्ती केली. नाईक समितीच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्रामध्ये 1962 मध्ये त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्त्वात आली. या व्यवस्थेमधील जिल्हा परिशदा आणि पंचायत समित्यांचे कामकाज 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम 1961 नुसार चालते. पंचायत समित्या ह्या जिल्हा परिषदेचा एक घटक म्हणून काम पाहतात. पंचायत समित्यांना ग्रामपंचायती सारखे स्वतंत्र अस्तित्त्व नाही. तथापि 73 व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायत समित्यांना थोडे अधिक स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

***अभ्यासविषयाचे स्वरुप :*** प्रस्तुत शोध प्रबंधात नांदेड जिल्ह्यातील एकूण सोळा तालुक्यातील प्रत्येकी दोन ग्रामपंचायतींची निवड करुन त्या ग्रामपंचायतीमधील सन 2000–2010 या कार्यकाळात झालेल्या ग्रामसभांचा आढावा घेण्यात येत आहे.

***अभ्यास विषयाचे महत्त्व :*** प्रस्तुत संशोधनातून ग्रामसभा गावाच्या विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात व गावाच्या विकासात थेट लोकांना सहभागी करुन घेता येवू शकते. हे सत्य मांडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय ग्रामसभांच्या अंमलबजावणी व त्या ग्रामसभेत मांडण्यात येणारे विषय, या संदर्भात अभ्यासाअंती काही शिफारशी ही सुचविण्यात आल्या आहेत. सदरील शिफारशीमुळे ग्रामसभा गावाच्या विकासात आणखी भरीव स्वरुपाचे कार्य करु शकते, हे सिध्द् करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व दृष्टीकोनातून अभ्यास विषयाचे महत्त्व आहे.

***संशोधन समस्या :*** प्रस्तुत संशोधनातून ग्रामसभा म्हणजे काय?गामसभेची गावाच्या विकासात नेमकी भूमिका काय आहे?अशा विविध समस्यांचा शोध संशोधन कार्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

***संशोधनाचे उदिष्ट्ये :*** (1) नांदेड जिल्ह्यातील ग्रामसभेचा सर्वंकश अभ्यास करणे. (2) नांदेड जिल्ह्यातील ग्रामसभा ह्या परीपूर्ण आहेत का?याचा शोध घेणे. (3) नांदेड जिल्ह्यातील ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांची फलश्रृती अभ्यासणे. (4) नांदेड जिल्ह्यातील ग्रामसभेतील लोक सहभाग, महिला सहभाग अभ्यासणे. (5) नांदेड जिल्ह्यातील ग्रामविकासासोबतच राष्ट्र विकासात ग्रामसभेचे योगदान.

***संशोधनाचे गृहितकृते :*** (1) ग्रामसभा ही ग्रामीण भागातील प्रबळ व्यवस्था आहे. (2) ग्रामसभेच्या निर्णयानुसारच ग्रामपंचायतीचा कार्यक्रम आखल्या जातो. (3) ग्रामसभेत लोकांनी सहभाग घेऊन विविध प्रश्न विचारुन ठराव घेण्यात आले. (4) ग्रामसभेच्या बैठकीत महिलांचा सहभाग अत्यंत नगण्य आहे. (5) ग्रामविकासाची जबाबदारी ग्रामसभेवरच आहे.

***अध्ययन पध्द्ती :*** प्रस्तुत संशोधन लेखाच्या कार्यासाठी संशोधकाने विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्द्तीचा उपयोग केला आहे. त्यात शासकिय अहवालातील आकडेवारी, विविध संदर्भ ग्रंथ, शोध ग्रंथ, मासिके, पुस्तके तसेच इंटरनेटचा सहभाग आहे.

***अध्ययन व्याप्ती :*** नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामधील दोन ग्रामपंचायतींची निवड संशोधन कार्यासाठी करण्यात आली असून ह्या ग्रापंचायतीमधील सन 2000 ते 2010 ह्या कार्यकाळात झालेल्या ग्रामसभेचा आढावा घेण्यात आला आहे, हीच संशोधन विशयाची व्याप्ती आहे.

***निष्कर्ष :***

महाराष्ट्रात ग्रामसभेला सध्या असलेले स्थान विचारात घेता असे दिसून येते की, ती अगदीच दुर्लक्षित राहिली आहे. तिची मोठ्या प्रमाणावर उपेक्षाच झाली आहे, असे म्हणावे लागेल. ग्रामसभेला अशा प्रकारचे दुय्यम स्थान प्राप्त होण्याची काही कारणे पुढील प्रमाणे सांगता येईल, –

1.ग्रामीण राजकारणाचे विशिष्ठ स्वरुप : ग्रामीण भागात ग्रामपंचायतीवर समाजातील श्रीमंत वर्गाचाच जास्त प्रभाव असल्यामूळे गरीब जनता ग्रामसभेत आवाज उठवत नाही. त्यामुळे ग्रामसभेला फारसा अर्थ उरत नाही.
2.सामान्य जनतेची राजकीय उदासिनता : सामान्य जनतेला ग्रामपंचायतीच्या अधिकाराची, कर्तव्याची, ग्रामसभेविषयी काहीच माहिती नसते. तसेच ती माहिती करुन घ्यावी, असे ही त्यांना वाटत नाही. त्यामुळे ग्रामसभा निष्क्रीय होत आहे.
3.निरक्षरता व अज्ञान : नागरी समाजापेक्षा ग्रामीण जनता आज ही बऱ्याच प्रमाणात निरक्षर, अज्ञानी आहे. त्यामुळे ते ग्रामसभेत सहभाग घेत नाहीत.
4.पदाधिकाऱ्यांकडून उपेक्षा : ग्रापंचायतींच्या पदाधिकाऱ्यांना गावातील लोकांनी आपणास प्रश्न विचारावेत, आपल्यावर नियंत्रण ठेवावे, हे त्यांना मनापासून आवडत नाही. म्हणून ग्रामसभेला हे पदाधिकारी महत्त्व देत नाहीत.
5.बैठकीची गैरसोयीची वेळ : ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. ग्रामसभा ही लोक शेतीच्या कामात व्यस्त असतांना ठेवण्यात येते. त्यामुळे ग्रामीण जनता ही आपल्याच कामांना जास्त प्राधान्य देवून ग्रामसभेला दुय्यम स्थान देतात.

वरील प्रमाणे ग्रामसभा यशस्वी का होत नाहीत ह्याची विविध कारणे सांगता येतील. ह्या ग्रामसभेला सक्रिय करण्यासाठी काही शिफारशी पुढील प्रमाणे करता येतील, –

***शिफारशी :***

भारतीय लोकशाहीला बळकटी आणण्याचे कार्य 'ग्रामसभा' करु शकते, म्हणून तिच्या अधिकारात वाढ करुन ती अधिक मजबूत करण्यासाठी पुढील काही शिफारशी करता येतील.

1.ग्रामसभेच्या सुरुवातीस करमणुक प्रधान कार्यक्रम ठेवावा.
2.जिल्हापरिषद, पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ह्या ग्रामसभेला आवर्जून हजेरी लावली पाहीजे.
3.जबाबदार शासकीय अधिकाऱ्यांनी ह्या ग्रामसभेला हजेरी लावावी.
4.गावकऱ्यांच्या सोयीची वेळ घेवून ग्रामसभा आयोजित करावी.
5.लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा होऊन त्यांचा फायदा त्यांना लवकर मिळावा.
6.ग्रामसभेत जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे ह्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करावे.
7.साक्षरता वाढवून लोकांना ग्रामपंचायतीच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव करुन देण्यात यावी.

वरील प्रमाणे अनेक शिफारशी करता येतील. ह्या सर्व प्रक्रियेमूळे भारतीय लोकशाहीची मुळे तळागळात रूजतील व त्यातूनच गावाचा, राज्याचा व संपूर्ण देशाचा विकास हा झपाट्याने होवून आपला देश महासत्ता होण्यात ह्या ग्रामसभेचा हातभार लागेल. ह्यात शंकाच वाटत नाही.

***संदर्भ :***

1.प्रा. पाटिल व्ही. बी., ''महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था'', के. सागर पब्लिकेशन, पूणे–2005, पृ. क्र. 50
2.प्रा. बंग के. आर, ''भारतातील स्थानिक स्वशासन – विशेष संदर्भ: महाराष्ट्र राज्य'' श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर–2005, पृ. क्र. 83
3.नलावडे प्रमोद, ''लोकराज्य–ग्रामोन्नती विशेष..... माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन–2012'', पृ. क्र. 08
4.जाधव तुकाराम, ''भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया'' युनिक अकॅडमी, पूणे–2011, पृ. क्र. 243.
5.जाधव तुकाराम, ''महाराष्ट्र वार्षिकी 2013'' द. युनिक अकॅडमी, पूणे–2013, पृ. क्र. 596.
6.जिल्हा परिशद वार्शिक अहवाल' 2012, जिल्हा परिषद नांदेड.
7.सोनार गोदाजी, ''आपला नांदेड जिल्हा'', श्रेयश प्रकाशन नांदेड–2012, पृ. क्र. 34

